**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
**११३(अ), सिध्देश्वर पेठ, (एस.बी.आय. ट्रेझरी शेजारी) सोलापूर - ४१३ ००१**

## Recruitment Code – 104

## नोकरभरती करिता जाहिरात

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या कोल्हापूर जिल्हयात प्रधान कार्यालय असलेल्या व रु. ४५० कोटी मिश्र व्यवसाय असणाऱ्या सहकारी बँकेत खालील पदांसाठी सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर मार्फत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज सादर करण्याची संपूर्ण प्रक्रिया तसेच पदाकरिता आवश्यक त्या शैक्षणिक व इतर अर्हता तसेच इतर तपशील https://www.surbanksassociation.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | रिक्त पदाचे नाव | वयोमर्यादा | रिक्त पद संख्या | पदासाठी आवश्यक निर्धारित शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १. | **कनिष्ठ लिपिक** | दिनांक ३१ डिसेंबर २०२३ ला किमान वयोमर्यादा २२ व कमाल ३५ वर्षे राहील. | **१९** | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा पदव्युत्तर व एम.एस.सी.आय.टी. समकक्ष किंवा तत्सम संगणक अर्हता.<br><br>**प्राधान्य :-**<br>JAIIB / CAIIB / GDC&A तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची (ICM,IIBF,VAMNICOM इ.) बँकींग / सहकार / कायदेविषयक पदविका.<br>बँका / पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थामधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

### अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज परीक्षा शुल्कासहित सादर करण्याची तारीख. | २८/०२/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| २. | ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख | ०९/०३/२०२४ रात्री ११.५९ पर्यंत |

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| १. | अर्ज करण्याची पद्धत :-<br>ऑनलाईन अर्ज सादर करण्याबत सविस्तर सूचना https://www.surbanksassociation.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवार त्याचा अर्ज इंटरनेट सुविधा असलेल्या ठिकाणी भरू शकेल. |
| २. | https://www.surbanksassociation.in या संकेतस्थळावर अर्जदारांनी रजिस्ट्रेशन करावे.<br>**( अर्जदारांनी अर्ज करण्याआधी जाहिरातीमधील पदे व त्याकरिता लागणारी शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा बघूनच अर्ज भरावा. )**<br>**नोंदणी**<br>रजिस्ट्रेशन करतांना स्वत:चा आधार नंबर, नाव, वडिलांचे नाव, आडनाव, वैध असलेला मोबाईल नंबर, वैध इमेल आयडी भरून रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करावी. |
| ३. | रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यावर समोरील पेज वर User ID & Password दिसेल, तसेच अर्ज भरतांना नमूद केला गेलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS सुद्धा पाठविला जाईल तो पदभरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत सांभाळून ठेवणे महत्वाचे आहे. |
| ४. | **पद निवडणे**<br>अर्जदारांनी पद निवडून पुढे जावे. |
| ५. | **वैयक्तिक माहिती**<br>अर्जदारांनी वैयक्तिक माहिती मध्ये अर्जदारांचा पत्ता, इत्यादी माहिती या स्टेप मध्ये अर्जदारांनी अचूक भरावी. |
| ६. | **शैक्षणिक अर्हता**<br>अर्जदारांनी शैक्षणिक अर्हतेची माहिती अचूक भरावी, अर्ज Submit करायच्या आधी अर्जदार माहितीमध्ये बदल करू शकतो पण एकदा अर्ज Submit केल्यावर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही किंवा त्याची विनंती मान्य केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ७. | **अनुभव माहिती**<br>अर्जदार यांच्या कडे अनुभव असल्यास त्यांनी अनुभवाची माहिती भरून Submit या बटन वर क्लिक करून पुढे जावे. ( ज्या अर्जदारांकडे अनुभव नाही त्यांनी Skip या बटन वर क्लिक करून पुढे जावे ) |

| | |
|---|---|
| ८. | **छायाचित्र व स्वाक्षरी** |

| तपशील | Size Limit | Details |
|---|---|---|
| अर्जदाराचे अलीकडील / नवीन पासपोर्ट छायाचित्र | JPG / JPEG Format मधील २० KB ते १०० KB पर्यंत | लांबी x रुंदी प्रमाण ( Proportion) ३.५ सें. मी. X ४.५ सें. मी. असावे. छायाचित्राचा ७५% भाग चेहरा असावा. |
| अर्जदाराची स्वाक्षरी | JPG / JPEG Format मधील २० KB ते १०० KB पर्यंत | कोऱ्या पांढऱ्या कागदावर गडद जाड पॉईंटच्या पेनने स्वाक्षरी असावी. |
| **महत्वाची सूचना :- छायाचित्र व स्वाक्षरी हि स्पष्टपणे दिसेल अशी स्कॅन करून अपलोड करावी. अस्पष्ट छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड केल्यास अर्जदार परीक्षेस अपात्र ठरू शकतात.** | | |
| | | |

| | |
|---|---|
| ९. | **अर्जाची संपूर्ण माहिती**<br>अर्ज करतांना भरलेली संपूर्ण माहिती अर्जदारांना या स्टेप मध्ये पाहता येईल. अर्जदारांना अर्जात काही बदल करावयाचा असल्यास Home बटन वर क्लिक करून Edit या Option वर क्लिक करावे. किंवा संपूर्ण अर्ज बरोबर असल्यास अर्जदारांनी Submit बटन वर क्लिक करून पुढे जावे. एकदा अर्ज Submit केल्यावर अर्जदार अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू शकणार नाहीत. |
| १०. | **परीक्षा शुल्क**<br>परीक्षा शुल्क भरण्याची सुविधा हि ऑनलाईन पद्धतीने असल्याने अर्जदार हे परीक्षा शुल्क Net Banking / Credit Card / Debit Card / UPI / QR Code च्या माध्यमातून करू शकतात. ऑनलाईन पेमेंट System मध्ये अर्जदाराचे परीक्षा शुल्क Update होण्याकरिता ४८ तास ते ७२ तास लागू शकतात. अर्जदारांना याबद्दल काही मदत हवी असल्यास संकेतस्थळावर दिलेल्या Helpline Number वर संपर्क साधावा.<br>**परीक्षा शुल्काविना आलेल्या अर्जांना विचारात घेतले जाणार नाही.** |
| ११. | **अर्जाची प्रिंट**<br>परीक्षा शुल्क भरून झाल्यावर अर्जदारांना अर्जाची प्रत व त्यासोबत परीक्षा शुल्क भरल्याची प्रत PDF स्वरुपात मिळेल. अर्जदारांनी पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत:कडे सांभाळून ठेवावी. |
| १२. | **महत्वाची माहिती**<br>❖ ऑफलाईन परीक्षेचे वेळापत्रक व दिनांक स्वतंत्रपणे संकेतस्थळावर उपलब्ध होईल. त्यामुळे अर्जदारांनी संकेतस्थळावर नेहमी अद्ययावत राहावे.<br>❖ नोकरीसाठी केली जाणारी कोणत्याही प्रकारची शिफारस अर्जदाराची अपात्रता ठरेल.<br>❖ अर्जदारांना कुठल्याच प्रकारचा प्रवास व इतर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. अर्जदारांनी स्वखर्चाने परीक्षा व मुलाखतीस हजर राहावे. |

| | |
|---|---|
| | ❖ नियुक्ती करिता गुणवत्ता यादी नुसार मूळ दस्तऐवजाची / कागदपत्र / प्रमाणपत्राच्या प्रत्यक्ष पडताळणी ( Document Verification ) व मौखिक परीक्षेची तारीख संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जाईल. कागदपत्र नकली, खोडतोड केलेली, अपूर्ण आढळल्यास गुणवत्तेनुसार पुढील उमेदवारास पाचारण करण्यात येईल.<br>❖ सदर परीक्षा उमेदवाराचे कोणतेही शैक्षणिक कागदपत्र तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे परीक्षेनंतर कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास त्यास अपात्र करण्यात येईल. फक्त परीक्षेला बसू दिल्यामुळे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही.<br>❖ परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारास फक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. परीक्षा प्रवेश पत्र पोस्टाने पाठविला जाणार नाही याची नोंद घ्यावी.<br>❖ **अर्ज करतांना अर्जदाराचे वय किमान २२ वर्ष व कमाल ३५ वर्ष पूर्ण असावे. वयोमर्यादा गणण्याचा दिनांक ३१/१२/२०२३ आहे.**<br>❖ परीक्षेचे ठिकाण हे कोल्हापूर राहील.<br>❖ परीक्षा हि लेखी स्वरुपाची राहील.<br>❖ उमेदवाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक भरावी. कोणतीही माहिती अथवा तपशील चुकीचा अथवा खोटा आढळल्यास अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. |
| १३. | **परीक्षा शुल्क**<br>प्रस्तुत भरती प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.<br>( परीक्षा शुल्क विना परतावा राहील )<br>परीक्षा शुल्क :- रु. ७०८ /- (१८% जी.एस.टी. सहित) + Applicable Bank Transaction Charges |

सदर जाहिरातींमधील नमूद पदांची संख्या बँकेच्या आवश्यकतेनुसार कमी / जास्त होऊ शकते. नोकर भरती विषयक सर्वाधिकार बँक राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशत: प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.

( स्वाक्षरी )